Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

Original Article

# बाबाराव मडावी यांच्या समग्र साहित्याचा विवेचक अभ्यास

**सूर्यभान पी. डोंगरे[1], डॉ. प्रा. राजकुमार मुसने[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
[2]मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख, भगवंतराव महाविद्यालय, आष्टी. जि. गडचिरोली

**Manuscript ID**:
JRD -2026-180518
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 5(A)
Pp. 76-78
May- 2026
**Submitted:** 15 Apr. 2026
**Revised:** 25 Apr. 2026
**Accepted:** 10 May. 2026
**Published:** 31 May 2026

**सारांश:** "बाबाराव मडावी यांच्या 'आकांत' या स्वकथनातील आदिवासी जाणीवा" या संशोधन लेखात बाबाराव मडावी यांच्या *आकांत* या आत्मकथनातून व्यक्त झालेल्या आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक वास्तवाचा अभ्यास करण्यात आला आहे. लेखकाने स्वतःच्या जीवनातील दारिद्र्य, उपासमार, जातीय भेदभाव आणि शिक्षणासाठी केलेला संघर्ष यांचे प्रभावी चित्रण केले आहे. आदिवासी समाजावर होणारे अन्याय, शोषण, नकली आदिवासींच्या माध्यमातून होणारी फसवणूक, रोजगाराच्या संधींपासून वंचितता, कुपोषण आणि शासनाच्या योजनांची अपुरी अंमलबजावणी यांसारख्या समस्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. बाबाराव मडावी यांनी सामाजिक कार्यकर्ते म्हणून आदिवासी संघटनांद्वारे अन्यायाविरुद्ध लढा दिला आणि समाजजागृतीचे कार्य केले. त्यांच्या लेखनातून आदिवासींच्या वेदना, संघर्ष, विद्रोह आणि सामाजिक न्यायाची आकांक्षा स्पष्टपणे दिसून येते. हे आत्मकथन आदिवासी जीवनाचे वास्तववादी चित्र उभे करत असून सामाजिक समता, मानवी हक्क आणि आदिवासी अस्मितेचे महत्त्व अधोरेखित करते.

**मुख्यशब्द:** बाबाराव मडावी, आकांत, आदिवासी जाणीवा, आत्मकथन, आदिवासी समाज, सामाजिक अन्याय, दारिद्र्य, शोषण, सामाजिक चळवळ, आदिवासी अस्मिता.

**प्रस्तावना :-**

बाबाराव मडावी यांच्या 'आकांत' या स्वकथनात त्यांना जीवन जगतांना आलेल्या अनुभवाचे चित्रण असुन या स्वकथनाचे दोन भाग असून पहिल्या भागात त्यांनी स्वतःच्या आणि कुटुंबाच्या जीवनातील संघर्ष रेखाटलेला असून दुसर्या भागात सामाजिक कार्याची माहिती सांगितलेली आहे. मी या शोधनिबंधात बाबाराव मडावी यांच्या 'आकांत' या स्वकथनातील आदिवासी समाजाच्या जाणिवांचा आढावा घेतलेला आहे. आदिवासी समाजात जन्म झाल्यामुळे बालपणातच बाबाराव यांना कशा प्रकारे अवहेलना झाली तो प्रसंग, त्यानंतर आदिवासी तरुणांना शेतात मारहाण, आदिवासी मुलींची रस्त्यात अडवून केलेला छळ, आदिवासी पटवाऱ्याला सरपंचकडून झालेली मारहाण तसेच नकली आदिवासी बनुन आदिवासींच्या नोकऱ्या हडपण्याचे प्रसंग आणि शासनाने आदिवासींच्या विकासासाठी योजना मंजूर करतात पण त्यांची अंमलबजावणी न झाल्यामुळे आदिवासींचे होणारे हाल, कुपोषण, त्या मिळाव्या म्हणून काढलेले मोर्चे या सर्वांच्या आढावा या शोधनिबंधात घेतलेला आहे.

**परिचय:**

बाबाराव मडावी यांचा जन्म यवतमाळ जिल्यातील दिग्रस तालुक्यातील देहाणी या खेडे गावात ०५ डिसेंबर १९५२ ला झाला. त्यांच्या वडिलाचे नाव निंबाजी तर आईचे नाव चंद्रभागा होते. बाबाराव यांना अगदी सुरवातीला शिक्षणाची आवड नव्हती पण आई आणि मामांच्या आग्रहाने आणि कदम मास्तराच्या समजावण्याने त्यांन शाळेची गोडी वाटून त्यांनी प्रयत्नांची परकाष्ठा करून कधी होस्टेलमध्ये, तर कधी मित्रांच्या खोलीवर राहून. कधी उपाशी तर कधी एकवेळ जेवून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. अथक परीश्रमानंतर त्यांना नोकरी लागली.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*सूर्यभान पी. डोंगरे संशोधक विद्यार्थी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली*

**How to cite this article:**
*डोंगरे, सूर्यभान. पी., & मुसने, राजकुमार. (2026). बाबाराव मडावी यांच्या समग्र साहित्याचा विवेचक अभ्यास. Journal of research & development, 18(5(A)), 76–78. https://doi.org/10.5281/zenodo.20925718*

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.20925718

OPEN ACCESS

बाबाराव हे आदिवासी विकास विभागात नोकरीला असल्याने त्यांना महाराष्ट्रातील दुर्गम व डोंगरदऱ्यांत आदिवासी भागात त्यांना भेटी द्याव्या लागत असल्याने आदिवासींची परिस्थिती, त्यांचे जीवनमान प्रत्यक्ष पाहायला, अनुभवायला मिळून त्यांच्यातील लेखकाला पोषक वातावरण आणि प्रसंग मिळत गेलेत. ते लेखक तर होतेच पण सोबतच एक सामाजिक कार्यकर्ते सुद्धा होते. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते म्हणून आलेल्या अनुभवांचा त्यांच्या लेखनकार्यात लाभ झाला. हे पुस्तक लिहिण्यासाठी त्यांच्या पत्नी सुनंदाने हिम्मत दिली. त्यांचे स्नेही प्रा. चिंतामण कांबळे यांचा आग्रह आणि प्रा. अशोक कांबळे यांच्या प्रोत्साहनामुळे त्यांना बळ आल्याचे ते सांगतात. सोबतच दशरथ मडावी, बापूरावजी राजगडकर, प्रा. माधव सरकुंडे, वाहरू सोनावणे, लक्ष्मीकांत घुमे, शरद आकोलकर, देविदास खंडारे यांच्या सहानुभूतीमुळे हे पुस्तक पूर्णत्वास नेता आल्याचा उल्लेख त्यांनी आपल्या मनोगतात केले आहे.

**मुख्य कथानक** :-

बाबाराव मडावी हे यवतमाळ जिल्ह्यातील एका लहानश्या खेडेगावातील परधान या आदिवासी जमातीतील असून आई - वडील मजुरीचे काम करत असल्याने घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. दारिद्र्य त्यांच्या पाचवीला पूजलेला होता. त्याची साक्ष म्हणून त्यांच्या घराच्या छतावरील असलेल्या गवताच्या पेंडी असल्याचे ते सांगतात. घरातील सर्व माणसे काबाडकष्ट करून जीवन जगणारी असल्याने त्या गरीबीचे चटके बाबाराव यांना बालपणापासूनच बसल्याचे त्यांनी 'आकांत' मध्ये कथन केलेले आहे. गरीब असल्यामुळे त्यांना बालपणातच मित्राच्या काकाकडून त्यांचा झालेला अपमान आणि त्याचवेळी आदिवासी म्हणून त्यांचा जातीचा केलेला उद्धार त्यामुळे त्यांच्या हृदयात झालेली कालवाकालव बाबाराव यांच्या बालमनावर खूप मोठा आघात करून गेल्याचे दिसते. त्या संदर्भात ते सांगतात, महेंद्र गोयल नावाचा परदेशी समाजाचा एक श्रीमंत घरातील वर्ग मित्र होता. त्याला लिहायचा कंटाळा येत असल्याने ते काम तो बाबाराव कडून करून घ्यायचा. त्याच्या वाडीत भाजीपाला असल्याने एक दिवस त्यांनी बाबाराव यांना भाजीपाला घेऊन जाण्याचा आग्रह केला तेव्हा, बाबाराव आपल्या प्यांटच्या खिश्यात मावतील तेवढे वांगे भरतात. त्यामुळे त्यांचे खिसे फुगून दिसतात. ते घराकडे परत येताना अर्ध्या रस्त्यावर महेंद्रचा काका भेटतो. तो त्याला विचारतो कुठे गेला, हा मुलगा कोणाचा आहे वगैरे चौकशी करतो. तेव्हा महेंद्र त्याचा काकाला सांगतो, लिंबा परधानाचा मुलगा आहे. तेव्हा त्याला जास्तच राग येतो, मग तो बाबाराव यांना खिश्यातील वांगे काढायला सांगतो त्यावर महेंद्र दिल्याचे जेव्हा बाबाराव सांगतात, तेव्हा तो म्हणतो, "महेंद्रन म्हणलं ईहीरीत उडी टाक त तू टाकशील काय ? चोर हाय तू फुकट हाईका वांगे." त्या प्रसंगाबद्दल बाबाराव सांगतात. "मी एक – एक वांगे काढून त्याला देत होतो. त्येन संमधे वांगे घेतले, मयावाला कान बी पीरगळला, लई बेकार वाटलं. श्रीमंताच्या पोरासंग दोस्ती केल्याचं बक्षीस मिळालं व्हतं. मी गरीबाचा पोरगा हाई म्हून – दोस्ता न जबर दस्तीन देलेले वांग त्येच्या चुलत्यान काढून घेतले. मला चोर बी ठरवल. मह्या जातीचा बी उद्धार केला. मह्या हृदयात कालवा कालव झाली व्हती. महेंद्र मात्तर ह्यो घटनेने हसत हुता. गरीबान – श्रीमंतासंग दोस्ती करू नायी काय? ईथ जात पाह्यली जाते. पैश्यान लहान मोठं केलं जाते – लहाण पणीच त्येच्या डागण्या बसल्या हाईत – या देशातली माणसच लई इपित्तर हाईत ! गरीबासंग लई भेदभाव करून वागत्यात."१ अशा प्रकारे बालपणात गरीब असल्याचे, आदिवासी असल्याचे चटके बाबाराव यांना बालपणात बसल्याचे सांगतात. बाबाराव मडावी म्हणतात, आदिवासी समाजात माझा जन्म झाला असून भूक आणि गरीबीचे चटके बसले आहेत. आपण आपल्या समाजासाठी काहीतरी करायला हवे. ते माझा कर्तव्य आहे. समाजातील शिकलेल्या प्रत्येक तरुणाचा कर्तव्य आहे. म्हणून आदिवासी लोकांची संघटना केली. त्यावेळी अनेक आदिवासी आपल्या समस्या घेऊन बाबाराव यांच्याकडे यायला लागले. त्या संदर्भात बाबाराव सांगतात, "मारेगाव तालुक्यातील उकंडा मडावीस त्याच्या शेतात मारण्याची धमकी देण्यात आली. पांढर कवड्यातील दोन शाळकरी मुलींना अडवून छेडछाड करण्याचा प्रयत्न करण्यात आला. आदिवासी पटवाऱ्याला सरपंचाकडून मारझोड करण्यात आली. एका आदिवासीची चक्की दुसऱ्यानेच हडप केली. अनेक तरुणांना नोकऱ्या नाही."२ अशा प्रकारच्या आदिवासींच्या अनेक समस्याच समस्या असल्याने कित्येक अर्ज आदिवासींच्या संघटनेकडे येऊ लागले होते. संघटनेच्या माध्यमातून कार्य सुरु झाले होते. आदिवासींचे नेते मंडळी आदिवासींवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी मैदानात उतरली होती. विदर्भ स्तरावर आदिवासी संरक्षण समितीची स्थापना केली. या संघटनेच्या माध्यमातून संपूर्ण विदर्भ जागा झाला. आदिवासींच्या मागण्या घेवून नागपूर विधान सभेवर पन्नास हजारांचा मोर्चा गेला. त्या प्रसंगी बाबाराव मडावी यांचे सुद्धा भाषण झाले. ते म्हणाले, "माय बापहो, आदिवासींसाठी अनेक चांगले कायदे शासनाने केले आहेत. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. मागासवर्गीय - आदिवासी – दुबळया माणसासाठी कायदे केल्या जात असतील आणि त्यांची अंमलबजावणी होत नसेल तर त्या कायद्यांना अर्थ उरणार नाही. आदिवासींचा जमीन हस्तांतरण कायदा १९७४ साली झाला. त्याचा अंमल अजूनही नाही. नकली आदिवासी होतात कसे ? खरा आदिवासी सवलतीपासून वंचित आहे. त्यासाठी आदिवासींच्या उत्थानाची सामाजिक क्रांती आवश्यक आहे. आपले हक्क मिळविण्यासाठी डॉ. आंबेडकरांचा संदेश घ्या. शिक्षणातून क्रांती करायची आहे. अंधश्रद्धेला मुठमाती द्या – निर्व्यसनी व्हा ! अमेरिकेतला निग्रो क्रांतीतून पुढं आला. भारतातला मागासवर्गीय क्रांतीतून पुढं आला. संघटीत व्हा – संघर्ष करा."३ अशा प्रकारे बुलंद आवाजात बाबाराव मडावी यांचा भाषण झाला होता. नेहमीप्रमाणे आश्वासन मिळाला होता. बाबाराव मडावी यांनी आदिवासी समाजाचे दारून चित्रण वाचकांच्या डोळयांसमोर उभे केले. ते म्हणतात, "मी सगळीकडे न्याहळत होतो. काही पैसा घेवून पळत होती. काही उपाशी पोटी पळतांना दिसली. काही चळवळीत धडपडतांनाही दिसली. काही माणसं समाजसेवेच्या नावावर ढोंगी बगळे बनून माणसांना लुटतांना दिसली. माणसं माणसाचा व्यापार करून खोट्या प्रतिष्ठेत वावरतांना दिसली. सर्वत्र पळापळ जीवनाचे धागे आडवे - उभे, खोट्या प्रतिष्ठेचे, भ्रष्टाचाराचे, फसवणुकीचे, असामाजिक तत्त्वाचे ओढणारी माणसं पुढे पुढे चालू लागली. अस्सल प्रामाणिक माणसं

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

मागे पडू लागली. त्यांच्या खांद्याला ठोकरुन ही माणसं पुढे कशी निघाली ?"४ वरील परिस्थितीमुळे अस्वस्थ होऊन बाबाराव म्हणतात खोट्या औलादीच्या माणसांना नष्ट करुन खरा माणूस उभा करायचा आहे. बिरसा फुले, शाहू, आंबेडकरांच्या तत्वज्ञानावर अस्सल होवून जळावे लागेल, अशा शर्यतीत जीवन होरपळून काढावे लागेल. समस्येत होरपळणाऱ्या माणसाधा व्यथा आकांतच्या पानापानावर उमटल्या आहेत. लेखक आपल्या जीवाचा त्रागा करून म्हणतो, "एकीकडे माझ्या नात्यागोत्यातील माझा बां, माय, बहिण, मोहल्ल्यातील जुने जाणती कष्ट करणारी माणसं ह्या समस्येत मला कायमची सोडून गेलीत. काही ह्या समस्येत मोठ्या संख्येने जगत आहेत. कुपोषणानं उपाशी मरत आहेत. मला नुसता अंधार दिसतो. मी किती घाव सोसू-! मला आता बंड करीत पुढे जायचे आहे -! आंदोलन करीत रहायचे आहे -! मी आयुष्यभर लढत राहील -! दारिद्रय उघड्या अंगावरुन गेले. रडण्याचे उसासे पहिले. डोळयातल्या आसवांची किंमत जाणली. कफल्लकांचे मरण मुठीत जीव धरून पाहिले. अनेक आघात झाले. पहाड कोसळले. हिंमतीनं झेलले. पोटातले आतडे भुकेनं ओरडले. त्याला दाबून ठेवले. सुत्र मरणाजवळ स्वतःला जागवत बसलो. रडलो दमलो निराश झालो. हताश होवून बसलो. पण हिंमतीनं कैकदा उठलो. जगण्यातली हिंमत हारायची नसतेच. माझा आकांत मी चौफेर उधळणार! आयुष्याचीच धुळधान झाली."५ आमच्या संसाराची सामाजिक परिस्थितीचे भान आणि जाणीवा ठेवून आकांत मध्ये आदिवासींच्या वेदना विद्रोह करतांना दिसतात. लेखक समाजाचा घटक असून सामाजिक समतेसाठी आसुसलेला आहे. तो लिहीतो. अरे कष्टाची घामाची काय किंमत असते ते उपभोगल्यावरच कळते. कष्ट करणारा माणूस किती महान आहे हे त्याचं त्यालाच माहित. ही दुनियाच निराळी, आपल्या मजबुत बाहुवरतीभार वाहून नेणारी आज त्यांचीच कदर नाही, समानतेच्या आधारावर हे कष्ट करणारे जीवंत रहावेत, आज काय त्यांच्यावर कुत्र्यामांजरासारखी जिंदगी लाटली आहे. अतिक्रमणातल्या झोपड्या पाडल्या. लेखकाची पत्नी नगर परिषद वार्ड मेंबर म्हणून नुकतीच निवडून आलेली सामाजिक भुमिकेतून लेखक पत्नीसह उपोषणाला बसतो. झोपडीतली माणस समस्या सांगतात लेखकाने त्यांच्या व्यथा शब्दबध्द केल्या. काळीजही थरारून जावं, "त्यांच रडणं पाहुन मी घरात गेलो. मुकाट्यानं रडून घेतलं. त्यांच्यासारखीच माझी अवस्था झाली. त्यांच्यातलाच आहो. रड येणार नाही तर काय ! त्यांची समस्या माझ्या हृदयाला रडवत होती. रडतांना म्हातारी म्हणाली. नवरा मेला पोर जवळ नाही. आता थकून गेली, चालनं होत नाही. भिक मागुन कसं ती जगतो. दुसरी म्हणाली पोटातलं पोट कापलं अन शिल्लक ठेवलं. घरी बसून खाण्याने तेही संपत हाये, पसारा राखत बसलो. घरावरचं छत गेलं. उघडयावरची जिंदगानी हाये कोणी बी समजून घेत नाही. आज मजुरी गेली कां उद्या उपाशी रहावं लागते. आता कुठं रहाव रोडवर येवून रहावं का? भाकर अंगी लागत नाही. कामी कुठं जावं आमचा येड्यावानी जीव झाला."६ अशा प्रकारे सामाजिक समस्येन शोषीत पिडीत गरीब कष्टकरी माणसांचा आकांत चितारल्या गेला. लेखकाचा परधान आदिवासी जमातीच्या मोहल्या बरोबर संपूर्ण आदिवासी जमातीच्या समस्या, इतर शोषणाने पिळलेल्या कटकरी माणसाच्या समस्या आकांतमध्ये जीवंत पणे उभ्या झाल्या. अशा प्रकारे बाबाराव मडावी यांच्या आकांत या स्वकथनातील आदिवासी जाणिवांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**निष्कर्ष:**

बाबाराव मडावी यांच्या दृष्टीने शोषित व अधिकारापासून वंचित राहिलेल्या लोकांपैकी आदिवासी सर्वात जास्त वंचित आहेत. तेच मूलनिवासी आहेत. त्यांचे मूलपण जपले पाहिजे. आदिवासी लोक अत्यंत हलाखीचे, दारिद्र्याचे जीवन जगात आहेत. अतिमागासलेपणा, शिक्षणापासून वंचित, रोगराई अशा गंभीर समस्यांना ते तोंड देत आहेत.जे लोक देशावर प्रेम करतात ते आदिवासींना इजा पोहोचवीत नाहीत आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक दर्जा उंचाविण्यासाठी मदत करतात.

1) आदिवासींना मागासले म्हणणाऱ्या लेखक साहित्यिकांना आपले साहित्य तत्त्वज्ञान तपासण्यास सांगून आदिवासींना मनोरंजनाची वस्तू समजू नये. तेही माणूस आहेत.
2) भारतात विविध जाती, धर्म, वंशाचे लोक असले तरी प्रत्येक जाती वंशाच्या लोकांना आदर व समान वागणूक मिळाली पाहिजे.
3) भारतातील संविधानाने सर्व माणसांना भाषा स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य समानता व संरक्षण बहाल केले आहे. हे सर्व असताना देखील शोषितांना न्याय मिळत नाही. त्यांचा सामाजिक दर्जा उंचावला पाहिजे.
4) या देशातील माणसांनी आदिवासींना बदलण्याचा मानस केला पाहिजे. त्यांच्या मुलतत्त्वाचा आदर केला पाहिजे.

**संदर्भ टिपा**

मडावी बाबाराव, सुधीर प्रकाशन, द्वितीय आवृत्ती ९ जून २००८, पृष्ठ- २५, ५६, ५७, ११, १३९, १३३.

सूर्यभान पी. डोंगरे
पत्ता :- मु. पोस्ट - गोजोली, तालुका – गोंडपिपरी, जिल्हा - चंद्रपूर, (महाराष्ट्र) ४४२७०२
मोबाईल :- ८८३०६९२३१० / ८२७५३१०२३६